**धनादेश न वटणे - त्याबाबतची कार्यपध्दती**

सं. डीबीओडी.बीसी.एलइहजी. क्र. ११३/०९.०१२.००१/२००२-०३

जून २६, २००३

सर्व अनुसूचित व्यावसायिक बँका
(आरआरबीज आणि एलएबीज वगळून)

प्रिय माननीय महोदय,

**धनादेश न वटणे - त्याबाबतची कार्यपध्दती**

जसे आपण जाणून आहात, जानेवारी १९९२ मध्ये, बँकाना न वटलेले धनादेश कोणत्याहि परिस्थितीत ग्राहकांना तातडीने दिरंगाईविना २४ तासाच्या आत परत केले पाहिजेत/पाठविले पाहिजेत ही गोइपोरिया समितीची शिफारस अंमलात आणण्यासाठी सल्ल देण्यात आला होता. (संदर्भ क्र. ३.३६ --आमचे परिपत्रक क्र. डीबीओडी.क्र.बीसी.७४/०९.०७.००१/९१-९२ दिनांकित २८ जानेवारी १९९२).

२. स्टॉक मार्केट घोटाळ्याच्या संयुक्त लोकसभा समितीच्या(जेपीसी) तपासाच्या अनुषंगाने, जेपीसी ने शिफारस केली आहे (अहवालाच्या परिच्छेद ५.२१४ मध्ये) कि, "रिझर्व बँकेने सर्व बँकाना, स्टॉक एक्स्चेंजमधून न वटणाऱ्या धनादेशांच्या बाबतीत विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली पाहिजेत." जेपीसीच्या पूर्वोक्त शिफारशीच्या दृष्टीकोनातून, न वटणाऱ्या सर्व धनादेशांच्या बाबतीतील अस्तित्वातील सर्व सुचनांचे पुनरावलोकन करण्यात आले आहे.

३. आम्हाला हे माहित आहे कि, बँका यापूर्वीच धनादेश न वाटण्याच्या बाबतीत उक्त सूचना लक्षत घेऊन उचित कार्यपध्दतीचा अवलंब करीत आहेत. तथापि, या बाबतीत सर्व बँकानी अवलंबण्यासाठी कार्यपध्दतीची निश्चित रुपरेखा आखणे गरजेचे आहे. त्यामुळे असे सुचविण्यात येत आहे कि, निधीच्या कमतरतेमुळे साधनाच्या न वटण्याच्या बाबतीतील विद्यमान सूचनांच्या व्यतिरिक्त, बँकानी या परिपत्रकाच्या परिच्छेद ४ मध्ये ठरवून दिलेल्या अतिरिक्त सूचनांचे, ज्याद्वारे अपुऱ्या निधीमुळे न वाटणारे सर्व धनादेश समविष्ट होतील आणि न केवळ स्टॉक एक्स्वेंजमधील व्यवहारांशी संबधित धनादेश.

<u>४.१ न वटलेले धनादेश परत करण्यासाठी/पाठविण्यासाठी कार्यपध्दती</u>

(१) प्रदाती बँकेने क्लियरिंग हाऊसद्वारे प्रस्तुत करण्यात आलेले न वटलेले धनादेश, युनिफॉर्म रेग्युलेशन अँड रुलस फॉर बँकर्स कियरिंग हाऊसेस मधील अटींनुसार संबंधित क्लियरिंग हाऊसने विहीत केलेल्या परत करण्याच्या रितीनुसार परत करावेत. जमा करणाऱ्या बँकेने असे न वटलेले धनादेश ताबडतोब प्रदात्याला/धारकाला पाठवावेत.

(२) प्रदाती बँकेला, त्या बँकेतील दोन खात्यातील हस्तांतरणाद्वारे व्यवहाराच्या तडजोडीसाठी, थेट सादर केलेल्या धनादेशांच्या बाबतीत, तिने असे न वटलेले धनादेश ताबडतोब प्रदात्याला/धारकाला परत करावेत.

(३) सर्व खात्यांच्या बाबतीत, निधीच्या कमतरतेमुळे न वटलेले धनादेश "अपुऱ्या निधीमुळे" असे न वटण्याचे कारण दर्शविणाऱ्या सुचनेसह परत करावेत.

<u>४.२ न वटलेल्या धनादेशांची महिती</u>

(१) रु. १ कोटीहून अधिक रकमेच्या न वटलेल्या प्रत्येक धनादेशाची माहिती बँकेच्या घटकांबाबतच्या एमआयएसचा भाग म्हणून ठेवावी आणि संबंधित शाखानी अशी माहिती त्यांच्या संबंधित नियंत्रक कार्यालयाला/ मुख्यालयाला कळवावी.

(२) स्टॉक एक्स्चेंजच्या नावे काढलेल्या आणि न वटलेल्या धनादेशांच्या बाबतीत प्रत्येक बँकेने अशा धनादेशांच्या रकमेचा विचार न करता दलाल एककांशी संबंधित एमआयएसचा एक भाग म्हणून ते वेगळे एकत्रित करावेत, आणि त्यांच्या संबंधित मुख्यालयाला/मध्यवर्ती कार्यालायाला कळवावेत.

<u>४.३ वारंवार न वटणाऱ्या धनादेशांशी सामना करणे</u>

(१) ग्राहकाना आर्थिक शिस्त लावण्यासाठी, बँकानी धनादेशाची सुविधा असलेल्या खात्यांसाठी अशी अट लागू करावी कि, रु. एक कोटी आणि अधिक रकमेचे एखाद्या विशिष्ट खात्यावर काढलेले धनादेश आर्थिक वर्षात चार वेळा खात्यातील निधीच्या कमतरतेमुळे न वटल्यास, नवीन धनादेश पुस्तिका देण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे, बँका चालू खाते स्वनिर्णयाने बंद करु शकतात. तथापि, कॅश क्रेडीट खाते, ओव्हरड्राफ्ट खाते

अशा अग्रिमे खात्यांच्या बाबतीत, या खात्यांच्या संबंधातील क्रेडीट आणि धनादेश सुविधा पुढे चालू ठेवणे गरजेचे असल्यास किंवा अन्य कारणाने, मंजूरी प्राधीकाऱ्याच्या वरील स्तरावरील उचित प्राधिकाऱ्याने पुनरावलोकन करावे.

(२) विद्यमान खात्यांच्या प्रचलनाशी संबंधात उक्त (१) वरील अट लागू करण्याच्या हेतूने, बँका नवीन धनादेश पुस्तिका देताना, घटकाना नवीन अटीची सुचना देणारे पत्र द्यावे.

(३) एका आर्थिक वर्षात धनादेश काढणाऱ्या विशिष्ट खात्यावरील धनादेश तीन वेळा न वटल्यास बँकेने संबंधित घटकाला, उपरोक्त अटीकडे त्याचे लक्ष वेधणारी आणि त्याच खात्यावरील धनादेश आर्थिक वर्षात ४ थ्या वेळी न वटल्याच्या परिणामी धनादेशाची सुविधा बद होण्याचा इशारा देणारी सुचना निर्गमित करावी. अशीच इशारावजा सूचना बँक खाते बंद करू इच्छित असेल तेव्हाहि द्यावी.

४.४ सर्वसाधारण

(१) न वटलेल्या धनादेशाच्या बाबतीत तक्रारदाराच्या(म्हणजे न वटलेल्या धनादेशाचा प्राप्तकर्ता/धारक) वतीने बँकेने न वटलेल्या धनादेशाच्या बाबतीतील न्यायालयातील, ग्राहक मंचासमोरील किंवा अन्य सक्षम प्राधिकरणासमोरील खटल्यात धनादेश न वटल्याचा पुरावा देण्याच्या बाबतीत संपूर्ण सहकार्य करावे आणि त्याला/तिला धनादेश न वटल्याच्या वस्तुस्थितीचा कागदोपत्री पुरावा द्यावा.

(२) २००३-०४ च्या पहिल्या तिमाहीपासून म्हणजेच जुन २००३ रोजी संपणाऱ्या तिमाहीपासून, बँकानी त्यांच्या लेखपरिक्षकांसमोर/व्यवस्थापकीय समितिसमोर, दर तिमाहीला, उक्त २ शी संदर्भित विषयाच्या बाबतीतील एकत्रित माहिती ठेवावी.

५. बँकानी त्यांच्या संबंधित बोर्डाच्या मंजूरीने, न वटलेल्या धनादेशाच्या बाबतीत, अशा न वटलेल्या धनादेशाची माहिती धनादेश काढणाऱ्याला देण्यात किंवा असे न वटलेले धनादेश त्याला परत करण्यात अडथळा आणणे किंवा कळविण्यात दिरंगाई करणे यासाठी बँकेच्या कर्मचाऱ्याला किंवा अन्य जकोणत्याहि व्यक्तिला कोणताहि वाव राहू नये यासाठी न वटलेल्या धनादेशाच्या प्रकरणांशी सामना अंगभूत प्रतिबंधक उपाय असलेली उचित कार्यपध्दती स्वीकारावी. अशा न वटलेल्या धनादेशांची प्राप्तकर्त्याला रवानगी करण्यासाठी आणि उपरोक्त उद्देशाच्या पूर्ततेसाठी त्यांच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वे ठरवून द्यावीत आणि त्याना या तत्वांचे कठोरपणे पालन करण्याचा आणि त्यांची कठोर पूर्तता करण्याचा सल्ला द्यावा.

६. कृपया पोंच द्यावी.

आपला विश्वासू
सही/-
**(सी.आर. मुरलीधरन)**
**मुख्य महाव्यवस्थापक**